क्रमांक - ४२२
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
३ रा मजला, धर्मादाय आयुक्त भवन,
वरळी, मुंबई-४०० ०१८.
दिनांक :- 21 JAN 2016

# परिपत्रक क्र४५१ दिनांक : २१ /०१/ २०१६

## विषय :- मत्ता व दायित्व विवरणपत्राबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व प्रदेशिक विभाग प्रमुख / कार्यालयीन प्रमुख यांना कळविण्यांत येते की, शासन सेवेत नियुक्त होणा-या अधिकारी / कर्मचा-यांना नियुक्तीनंतर मत्ता व दायित्व या बाबतचे विवरणपत्रे कार्यालयास सादर करणे, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दि. २१ जून, २०१४. व परिपत्रक क्र. संकीर्ण- ४३१३/प्र.क्र.१८४/ दोन-अ दि.२१ जून, २०१४ चे परिपत्रक नुसार बंधनकारक असून त्यानंतर दरवर्षी ३० जून अखेर पर्यंत सदर विवरणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी / कर्मचा-यांकडून मत्ता व दायित्व या बाबतची विवरणपत्रे दरवर्षी माहे जून अखेर पर्यंत प्राप्त करुन घ्यावीत त्याबाबची नोंदवही ठेवून प्रतिवर्षी त्यानुसार नोंद ठेवण्यांत यावीत अधिका-यांची मत्ता व दायित्वे याबाबतची विवरणपत्रे मुख्यालयात दोन प्रतीत पाठविणेत यावीत. सर्व गट 'क' संवर्गातील कर्मचा-यांची विवरणपत्रे संबंधित प्रादेशिक अधिकारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचेकडे पाकीटावर मत्ता व दायित्वा असे स्पष्ट नमूद करुन सीलबंद करुन ठेवणेत यावीत अधिकारी वर्गाची मत्ता व दायित्वाबाबतची विवरणपत्रे दोन प्रतीत सीलबंद स्थितीतच मुख्यालयात पाठविणेत यावीत.

त्याच प्रमाणे जे अधिकारी / कर्मचारी मत्ता व दायित्व याबाबतची विवरणपत्रे सादर करणार नाही त्यांचा पदोन्नतीच्या वेळी विचार केला जाणार नाही याबाबतची सर्व कर्मचारी / अधिकारी यांना समज देण्यात यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त.
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त.
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त.
४. लेखा संचालक, मुख्यालय.